प्रकरण सातवे

# 'महात्मा' चे महत्त्व

प्रकरण सातवे :

# ‘ महात्मा ’ चे महत्त्व

## ७.१ प्रास्ताविक :

‘महात्मा’ ही मराठी कादंबरीवाङ्मयातील एक लक्षवेधक अशी चरित्रात्मक कादंबरी आहे. ह्या कादंबरी अगोदर म.जोतीराव फुले ह्यांच्यावर तेरा कादंबऱ्या मराठीत लिहिल्या गेल्या आहेत. परंतु त्या तितक्याशा लक्षणीय म्हणता येत नाहीत. मुळात चरित्रात्मक कादंबरी लिहिणे, ही तारेवरची कसरत असते. मात्र त्यात कादंबरीकार रवींद्र ठाकूर यशस्वी झाले आहेत. म.फुले ह्यांचे जीवनचरित्र, त्यांची वैचारिकता हे समाजाला सर्व काही माहीतच आहे. परंतु त्यात कादंबरीकाराने नावीन्य आणले आहे. अशा ह्या कादंबरीतून वाचकाला आनंदा बरोबरच प्रेरणाही मिळेल, अशी खात्री वाटते.

‘महात्मा’ ह्या कादंबरीचे महत्त्व निश्चित करीत असताना आपणास हे जाणवते की, ‘महात्मा’ ही केवळ कादंबरी नाही, तर ते विचारधनाचे गोदामही आहे. कादंबरीकार पूर्णपणे फुलेमय होऊन गेलेला जाणवतो. त्याचबरोबर कलात्मक तटस्थता, अलिप्तता हीही जाणवते. दोन घटना-प्रसंगांमधल्या जागा कादंबरीकाराने आपल्या कल्पनाशक्तीने बेमालूमपणे भरून काढल्या आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष घटनाच समोर घडते आहे, असा भास होतो. म.फुले ह्यांच्या आयुष्यातील घटनांपूर्वी आणि घटनांनंतर त्यांची झालेली मानसिक अवस्था, मानसिक विचारमंथन, संघर्ष ह्यांचे अत्यंत तपशिलाने आणि नेमकेपणाने दर्शन ‘महात्मा’ त घडते. कादंबरीकाराने स्वतःची कलाकृती निर्माण करताना वैचारिकता व कलावंताची भूमिका ह्या दोन्हींची सांगड घातली आहे. दोन्हीही गोष्टींना कोठे तडा गेलेला दिसत नाही. दोन्हीही गोष्टी अगदी घासून पुसून त्यांनी त्या साच्यात आपसूक बसविलेल्या

आहेत. कोणत्याही प्रसंगाचे वर्णन कोठे जास्त पाल्हाळिक होत नाही किंवा कोठे कमीही होत नाही.

'महात्मा' ही कादंबरी सत्य घटनांवर आधारित असल्यामुळे ती तात्कालिक घटनांवर साहजिकच अधिक प्रकाश टाकते. ती सामान्य वाचकांबरोबरच चोखंदळ वाचकांनाही आपल्याकडे आकृष्ट करते. म.जोतीराव फुले ह्यांच्यावर आत्तापर्यंत मराठीत तेरा कादंबऱ्या निर्माण झाल्या आहेत. परंतु त्या वाचकांचे व समीक्षकांचेही फारसे लक्ष वेधून घेऊ शकल्या नव्हत्या. 'महात्मा' ने मात्र ह्या दोन्ही घटकांचे लक्ष वेधून घेतले आहे. 'महात्मा' ही कादंबरी प्रत्ययकारी असे प्रसंगवर्णन करणारी, निरपेक्ष वृत्तीने लिहिलेली, म. फुल्यांविषयी गैरसमज बाळगून असलेल्या विशिष्ट वर्गाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारी अशी झाली आहे. स्वातंत्र्य मिळाले. परंतु समतेचा नेमका अर्थ आजही तळागाळातल्या लोकांपर्यंत नीट पोहोचलेला नाही. तो विचार पर्वताएवढे कर्तृत्व ज्या व्यक्तीचे आहे, त्या म.फुले ह्यांनी समाजापर्यंत घेऊन जाण्याचा यशस्वी प्रयत्न केला. हेच कार्य ही कादंबरीही प्रभावीपणे पार पाडते. तिचे महत्त्व अजून पुढील मुद्यांमधून विशद करता येते :

## ७.२ एक उत्कृष्ट कादंबरी :

म. फुले ह्यांच्या जीवनचरित्रावर अनेकांनी आजपर्यंत विविध माध्यमांमधून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे जीवनकार्य सखोलपणे अभ्यासण्याचा प्रयत्नही अनेकांनी केला आहे. कादंबरीसारख्या ललित माध्यमातून त्यांचे जीवनचरित्रही पूर्वीच आपल्यासमोर आलेले आहे. परंतु ते तितकेसे समाधानकारक नव्हते. ज्ञात व्यक्तीचेच चरित्र पुन्हा नव्याने उभे करण्याचे कौशल्य कादंबरीकार रवींद्र ठाकूर ह्यांना मात्र साधले आहे. कादंबरीच्या उभारणीसाठी कादंबरीकाराला कथानक, व्यक्तिरेखा, वातावरणनिर्मिती व भाषाशैली ह्या चार प्रमुख घटकांचा आधार घ्यावा लागतो.

रवींद्र ठाकूर ह्यांनी युगपुरुष अशा जोतीराव फुले ह्यांच्या जीवनचरित्राकडे आकर्षित होऊन 'महात्मा' ही कादंबरी लिहिली. त्यांनी केलेले विविध स्वरूपाचे उल्लेखनीय कार्य व त्याभोवती गुंफलेले संपूर्ण कथानक हे वाचकांना माहीत असूनही तेच कथानक वाचक 'महात्मा' कादंबरीतून पुन्हापुन्हा वाचतात. कारण ही कादंबरी फक्त चरित्रकहाणीच नाही, तर वैचारिकतेने पुरेपूर भरलेली, त्यांचे वैचारिक व्यक्तिमत्त्व आविष्कृत करतकरत व्यक्त झालेली आहे. जुनेच कथानक पुन्हा नव्याने चिकित्सकतेने अभ्यास करून कादंबरीकार ठाकूर ह्यांनी 'महात्मा' ह्या आपल्या कादंबरीतून उभे केले आहे. म. फुल्यांचे फक्त चरित्रच नाही, तर म.फुले ह्यांची जीवनकहाणी त्यांनी पुन्हा मांडली आहे. 'महात्मा' कादंबरीचे चार भाग आहेत व १०१ प्रकरणे आहेत. सुरुवातीला म.फुले हे इंग्रजांशी बंड करणार होते. परंतु तत्कालीन सामाजिक अवस्था पाहून, अनुभव घेऊन, त्यांचे झालेले मत परिवर्तन, बनलेली विचारप्रणाली, थॉमस पेनच्या विचारांचा प्रभाव, त्यातून ध्येय ठरणे, सतत वाचन करणे, समाजातील जुनाट गोष्टींविषयी विचार करणे, अशा विविध घटनांचे महत्त्व स्पष्ट करीत आपल्या कौशल्याच्या साहाय्याने कादंबरीकाराने फुल्यांच्या बालपणापासून मृत्यूपर्यंतचा आलेख 'महात्मा' मधील कथानकातून काढला आहे. त्यांच्या आयुष्यात घडलेल्या प्रत्येक घडामोडीचा, त्यांच्यावर आलेल्या प्रत्येक प्रसंगाचा स्वत: अनुभव घेतल्याप्रमाणे पूर्णपणे फुलेमय होऊन त्यांनी ह्या कादंबरीतील कथानक मांडले आहे आणि वाचकांना चिंतन करण्यास प्रवृत्त केले आहे.

'महात्मा' कादंबरीतील व्यक्तिरेखांचा विचार केला, तर त्यात प्रमुख व्यक्तिरेखा म. फुले ही आहे. ती कादंबरीची केंद्रबिंदू आहे व इतर व्यक्तिरेखा तिच्याभोवती फिरत आहेत. कादंबरीच्या सुरुवातीलाच कादंबरीकार ठाकूर ह्यांनी कादंबरीतील व्यक्तिरेखांची एक यादीच दिली आहे. कादंबरीत जवळजवळ १८९ व्यक्तिरेखा आहेत व त्यांची मुळापासून माहिती आपणास कादंबरीतून मिळते. उदा. गोविंदराव फुले (दादा), सगुणाआऊ, इतर नातेवाईक,

सहकारी कृष्णराव भालेकर. ह्या व्यक्तिरेखांबरोबर लेखकमंडळी, राज्यकर्ते (महाराज सयाजीराव गायकवाड) अशा प्रत्येक व्यक्तीची ओळख आपणास ह्या कादंबरीतून होते. स्वत: म.फुले ह्यांचे व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर अगदी लहान असल्यापासून म्हणजे शाळेत जाणाऱ्या जोतीपासून ते जोतीराव, शेटजी, तात्या, 'महात्मा' अशा एकाच व्यक्तीच्या विविध पैलूंचे दर्शन आपणास त्यांच्या व्यक्तिरेखेतून घडते. कोणतेही संकट आले, तरी आपल्या ध्येयासाठी न डगमगता सतत कार्य करणारे व जे स्वप्न उराशी बाळगले, ते पूर्ण करण्यासाठी धडपडणारे म.फुले प्रत्येक ठिकाणी दिसून येतात. सामाजिक सुधारणा करीतकरीतच त्यांनी समाजातल्या प्रत्येक वर्गामध्ये वैचारिकता आणली व आपल्यावर होत असलेल्या युगानयुगाचा अन्याय त्यांना दाखवून दिला व त्याविरुध्द आवाज उठविण्यास त्यांना प्रवृत्त केले. कांदबरीकाराने हेच 'महात्मा' कांदबरीत आपल्या पध्दतीने सांगितले आहे. म. फुले ह्यांच्या बरोबरच सतत त्यांच्या पाठीशी सावलीप्रमाणे साथ देणाऱ्या सावित्रीबाईंचेही जीवनचरित्र आपल्यासमोर उभे राहते. ह्या व्याक्तिरेखांबरोबर इतर अनेक व्यक्तिरेखा कांदबरीकाराने बेमालूमपणे उभ्या करताना कोणत्याही व्यक्तिरेखेवर अन्याय केलेला नाही. अनेक व्यक्तिरेखांनी मिळूनच 'महात्मा' ही कादंबरी सजीव झाली आहे. काही व्यक्ती म. फुल्यांना मदत करत होत्या, म्हणून त्यांचे गुणच वर्णन करीत बसणे व विरोध करणाऱ्या व्यक्तींचे मात्र दोष वर्णन करीत बसणे, असे कुठेही कादंबरीकाराने केलेले आपणास दिसून येत नाही.

कादंबरीतील वर्णने प्रसंगनिष्ठ होण्यासाठी वातावरणाची गरज असते. पण ते वातावरण प्रसंगाला अनुरूप असेच असावे लागते. कादंबरीकाराने कादंबरीत कौटुंबिक, सामाजिक, राजकीय व भौगोलिक अशा वातावरणाद्वारे तत्कालीन एकूणच परिस्थिती कशी होती, ह्याचे जिवंत दर्शन आपल्यासमोर उभे केलेले आहे. कौटुंबिक वातावरणातून म.फुल्यांच्या घरातील वातावरणाचे दर्शन आपणास घडते. तत्कालीन लोकांच्या श्रध्दा,

समजुती, अंधश्रध्दा ह्यांचे दर्शन सामाजिक वातावरणातून घडते, तर इंग्रजांशी लढा देणाऱ्या कार्यकर्त्यांचे व तत्कालीन राजकीय लढ्याचे दर्शन राजकीय वातावरणातून घडते. चरित्रात्मक कादंबरी ही तशी व्यक्तिप्रधान कादंबरी असल्यामुळे त्या व्यक्तीच्या भाषेचाही कादंबरीकारास विचार करणे क्रमप्राप्त असते. कारण भाषाशैली शिवाय ती व्यक्तिरेखा आपल्यासमोर उभी राहू शकत नाही. 'महात्मा' कादंबरीत प्रमुख व्यक्तिरेखा म. जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले ह्यांच्याबरोबरच इतर व्यक्तिरेखा ह्यांच्या भाषेचा विचार केलेला आहे. तसेच कादंबरीकार रवींद्र ठाकूर ह्यांची स्वत:ची निवेदनशैली कशी ओघवती, सहजसुंदर आहे, हेही दिसून येते. त्यातून त्यांनी 'महात्मा' कादंबरीतील वैचारिक दृष्टिकोन अगदी सोप्या भाषेत वाचकांच्या हृदयात उतरविला आहे.

'महात्मा' कादंबरीचे महत्त्व विशद करताना आपणास ठामपणे म्हणता येईल की, कादंबरीकार रवींद्र ठाकूर ह्यांनी वरील चार प्रमुख घटकांचा सांगोपांग विचार करून ह्या सर्व घटकांद्वारे एक लक्षवेधक व उत्कृष्ट चरित्रात्मक कादंबरी मराठी कादंबरीविश्वाला बहाल केली आहे.

## ७.३ चरित्रात्मक कादंबरीचा एक आदर्श नमुना :

चरित्रात्मक कादंबरी म्हणजे एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीचे चरित्र कादंबरीच्या माध्यमातून चित्रित करणे होय. प्रथम ती व्यक्ती चारचौघासारखीच असते. परंतु पुढे ती आपल्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वामुळे असामान्य ठरत जाते. असे वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व कादंबरीकार चरित्रात्मक कादंबरीतून चित्रित करीत असतो. ती व्यक्ती तशी लौकिक असूनही ती अलौकिक कशी बनते, ह्याचे चित्रण चरित्रात्मक कादंबरीत येत असते. चरित्रात्मक कादंबरी म्हणते चरित्र व कादंबरी ह्यांचा योग्य मेळ करून निर्माण केलेली कलाकृती असते. चरित्रात त्या व्यक्तीचा जन्म, त्या व्यक्तीवर झालेले संस्कार, तिचे कार्य ह्यांचे दर्शन घडवलेले असते. पण ते मनोरंजनपर असतेच, असे नाही. ते रुक्ष, कंटाळवाणे

असण्याची दाट शक्यता असते. चरित्रात्मक कादंबरीत मात्र चरित्रनायकाच्या नाट्यमय आयुष्याचे चित्रण असावे लागते. रवींद्र ठाकूर ह्यांनी आपल्या कादंबरीत हे केले आहे. त्यांनी कादंबरीतून म.फुले ह्यांच्या संपूर्ण आयुष्याचे चित्रण केले आहे. त्यांच्या सर्वांगीण आयुष्याचा वेध घेताना फक्त केंद्रवर्ती व्यक्तीलाच त्यांनी महत्त्व दिले नाही, तर तत्कालीन इतिहासही पडताळून पाहिला आहे आणि तो पुराव्यानिशी कादंबरीत मांडला आहे. कादंबरी म्हणजे कल्पनारंजकता वापरून तयार केलेली कलाकृती. कादंबरीकार आपल्या कल्पनेने कादंबरीत रिकाम्या जागा भरू शकतो. चरित्रात्मक कादंबरीत मात्र असे चालत नाही. कारण ते चरित्र असते आणि चरित्रात कल्पनेला वाव नसतो. 'महात्मा' ह्या कादंबरीत इतिहास आणि कादंबरी ह्यांचा योग्य मेळ घातलेला आपणास दिसून येतो. म.फुले ह्यांच्या चरित्राबरोबर त्यांचे अंतर्मनही आपणास 'महात्मा' मधून पाहावयास मिळते. चरित्राशिवाय चरित्रात्मक कादंबरी तयार होऊच शकत नाही. कादंबरीत कल्पनेने रंगवलेले जीवन असते. कादंबरीकाराला जे भावले, जे आवडले, ते सर्व कादंबरीकार कादंबरीत मांडत असतो. चरित्रात्मक कादंबरीकाराला मात्र आपल्या भावनेला आवर घालत वास्तवच मांडावे लागते. वास्तवाशिवाय त्याला काहीच करता येत नाही. हवे तसे वर्णन करणे कादंबरीकाराला जमते. परंतु चरित्रात्मक कादंबरीत मात्र ते शक्यच नसते. चरित्रात्मक कादंबरीत व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत सर्व सत्य असते. ते चरित्राच्याच आधारे लिहावे लागते. चरित्रात्मक कादंबरीत कल्पनारंजकता असते, पण ती वास्तवतेला धरूनच असते. चरित्रात्मक कादंबरी म्हणजे चरित्राच्या हातात हात घालून कादंबरीला सोबत घेऊन केलेली उभारणी असते. ह्या पार्श्वभूमीवर विचार करता, असे म्हणता येते की, 'महात्मा' ही चरित्रात्मक कादंबरी तर आहेच,शिवाय चरित्रात्मक कादंबरीचा एक आदर्श नमुनासुध्दा आहे.

## ७.४ 'महात्मा' चे वेगळेपण :

'महात्मा' कादंबरीचे वेगळेपण निश्चित करीत असताना आपणास ह्या कादंबरीच्या अगोदर झालेल्या राष्ट्रपुरुषांवरील चरित्रात्मक कादंबऱ्यांचा थोडक्यात आढावा घ्यावा लागेल. चरित्रात्मक कादंबऱ्यांमध्ये राष्ट्रपुरुषांवरील चरित्रात्मक कादंबरी, सामाजिक विषयावरील चरित्रात्मक कादंबरी,पौराणिक व ऐतिहासिक विषयावरील चरित्रात्मक कादंबरी असे प्रकार आढळतात. राष्ट्रपुरुषावरील पहिली चरित्रात्मक कादंबरी असा 'यज्ञ' (१९६८) चा उल्लेख करावा लागेल. भा. द. खेर व शैलजाराजे ह्यांची ही कादंबरी सावरकरांच्या लढ्याचे चित्रण करणारी आहे. 'पुत्र मानवाचा' (१९६९) ह्या कादंबरीत म.गांधींच्या जीवनाचे चित्रण मृणालिनी देसाई ह्यांनी केले आहे. 'दुर्दम्य' (१९७०) ह्या कादंबरीतून गंगाधर गाडगीळ ह्यांनी लो.टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविले आहे. 'प्रेषित' (१९७०) ह्या कादंबरीतून न.म.जोशी ह्यांनी म. गांधीचे चरित्र व्यक्त केले आहे. 'अमृतपुत्र' (१९७०) ह्या कादंबरीतून भा. द. खेर ह्यांनी लालबहादूर शास्त्रींचे जीवन आपल्यासमोर आणले आहे. 'उत्तरयोगी' (१९७३) ह्या कादंबरीतून जोत्स्ना देवधर ह्यांनी योगी अरविंद घोष ह्यांचे चरित्र रेखाटले आहे. 'आनदंभवन'(१९७४) ह्या कादंबरीतून भा. द. खेर ह्यांनी नेहरू कुटुंबातील व्यक्तीचे दर्शन घडविले आहे. 'ओम् राष्टाय स्वाहा' (१९८७) ह्या कादंबरीतून मृणालिनी जोशी ह्यांनी गोळवलकरगुरुजींचे चरित्र व्यक्त केले आहे. 'प्रबुध्द' (१९८९) ह्या कादंबरीतून भा. द. खेर ह्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा गौरव केलेला आहे. 'वादळातील दीपस्तंभ' (१९८९) ह्या कादंबरीतून गो. नी. दांडेकर ह्यांनी डॉ. हेडगेवार ह्यांचे चरित्र रेखाटले आहे. 'सत्यं, शिवं, संदरम '(१९९१) ह्या कादंबरीतून रवींद्र भट ह्यांनी विवेकानंदांच्या आयुष्याचे दर्शन घडविले आहे. 'अर्ध्यदान' (१९९१) ह्या कादंबरीतून विद्या सप्रे-चौधरी ह्यांनी इंदिरा गांधींच्या जीवनाचे दर्शन घडविले आहे.

राष्ट्रपुरुषांच्या ह्या चरित्रात्मक कादंबऱ्यांबरोबरच आपणास म.जातिराव फुले ह्यांच्यावर असलेल्या इतर चरित्रात्मक कादंबऱ्याचाही थोडक्यात आढावा घ्यावयाचा आहे. 'जन्मसावित्री' ही दि.शं.नवरे ह्यांची कादंबरी १९४५ मधील आहे. 'झुंझार' (१९७४) ही हरिभाऊ पगारे ह्यांची कादंबरी २५५ पृष्ठांची व ३९ प्रकरणांमध्ये विभागलेली आहे. 'दीनांची साऊली' (१९८१) ही कृ. प. देशपांडे ह्यांची कादंबरी आहे. 'आभाळाएवढी' (१९८१) ही हिं. गो. बनसोडे ह्यांची कादंबरी १४४ पृष्ठांची व १७ प्रकरणांची आहे. 'तेवतो नंदादीप हा' (१९८२) ही नयनतारा देसाई ह्यांची कादंबरी १९१ पृष्ठांची व १४ प्रकरणांमध्ये विभागलेली आहे. 'सावित्री जोती' (१९८३) ही इंदुमती केळकर ह्यांची कादंबरी २६४ पृष्ठांची असून २७ प्रकरणामध्ये विभागलेली आहे. 'करुणासागर' (१९९८) ही अनंत शंकर ओगले ह्यांची कादंबरी १७४ पृष्ठांची असून ती २७ प्रकरणांमध्ये विभागलेली आहे. 'प्रभंजन' ( १९९० ) ही अनिरुध्द पुनर्वसू ह्यांची कादंबरी २२० पृष्ठांची असून १७ प्रकरणांमध्ये विभागलेली आहे.

चरित्रात्मक कादंबरीमध्ये चरित्रनायकाच्या केवळ नाट्यमय आयुष्याचेच चित्रण करून चालत नाही, तर त्याच्या सर्वांगीण आयुष्याचेच चित्रण त्यात आले पाहिजे. चरित्रनायकापुरते फक्त केवळ व्यक्तीलाच महत्त्व देण्यापेक्षा काळालाही महत्त्व दिले पाहिजे. हीच गोष्ट 'महात्मा' कादंबरीत आपणास दिसून येते. 'महात्मा' कादंबरीतील नायक म. फुले ह्यांच्या जीवनाचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्यांच्या कार्याचा विचार केला, तर आपणास जाणवेल की, त्यांचे चरित्र भावी पिढ्यांना मार्गदर्शक असे आहे. म. फुल्यांना स्वराज्याबरोबरच सुराज्यही हवे होते आणि त्यासाठी सर्व प्रकारचे स्वातंत्र्यही हवे होते. आपल्या हक्कांविषयी लोकांमध्ये जागृती निर्माण झाली पाहिजे,असे त्यांना वाटत होते. समाजात समता निर्माण होण्याची गरज त्यांना वाटत होती. त्यासाठी त्यांनी अहोरात्र कष्ट केले. कादंबरीकार रवींद्र ठाकूर ह्यांनी ह्या सर्वांचे चित्रण 'महात्मा' कादंबरीत केले आहे.

'महात्मा' कादंबरीचे महत्त्व ठरवित असताना आपणास हरी नरके ह्यांचे मत ध्यानात घेतले पाहिजे. ते मत असे : ''कादंबरीतला प्रत्येक शब्दन् शब्द मी वाचला-अगदी पुन्हा पुन्हा वाचला. अत्यंत मनापासून आवडलेली कादंबरी लिहिल्याबद्दल आणि अगदी उत्तमरीत्या प्रकाशित केल्याबद्दल लेखक आणि प्रकाशक या दोघांचे जाहीर अभिनंदन !''[१] हरी नरके ह्यांनी 'महात्मा' कादंबरीच्या प्रकाशन सोहळ्याच्या वेळी व्यक्त केलेले हे मत असून ते पुढे म्हणतात, ''कुठेही फारशा चुका मला आढळल्या नाहीत अगदी चूक काढायचीच म्हटलं, तरी कुठेही चूक आढळत नाही, इतकं उत्तम काम त्यांनी (म्हणजे ठाकूर ह्यांनी) केलं आहे.''[२] नागनाथ कोत्तापले 'महात्मा' कादंबरीविषयी म्हणतात, ''जेव्हा एखाद्या महापुरुषाच्या जीवनचरित्रावर कादंबरी लिहिली जात असते, तेव्हा त्या लेखकाचा दृष्टिकोण कोणता आहे, हासुध्दा फार महत्त्वाचा भाग असतो म. फुले यांच्याविषयी या पूर्वीच्या कादंबरीमधून प्रकट झालेला त्या त्या लेखकांचा त्या विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोण आणि डॉ. ठाकूर ह्यांचा दृष्टिकोण अगदी वेगळा आणि स्वतंत्र असा आहे. हे मूलभूत वेगळेपण आहे ते म. फुले यांच्या जीवनकार्याची मूळ प्रेरणा लक्षात घेण्याविषयीचे. म. फुले यांनी ज्या प्रेरणेने काम केलं, तो समग्र काळ समजावून घेऊन केवळ बहुजनांनाच नव्हे, तर समग्र समाजाला नवी चेतना देणारा क्रांतिकारक महापुरुष म्हणून येथे म. फुले या व्यक्तिमत्त्वाकडे पाहिले गेले आहे.''[३] कृष्णा इंगोले म्हणतात, ''म. फुल्यांच्या जीवनावर विविध स्वरूपाचे लेखन होऊ लागले. धनंजय कीर यांच्यासारख्या समर्थ चरित्रकाराने चरित्रकहाणी लिहिली आहे. परंतु त्यांचे जीवनचरित्र कादंबरीसारख्या ललित वाङ्मय प्रकाराद्वारे समाजासमोर येणे गरजेचे होते. त्यामुळे लोकमानसात म. फुले यांच्या विचारसरणीला आणि त्याच्या कार्याला खोलवर स्थान मिळाले असते. इतिहास जसा बखरीतून लोकप्रिय झाला, तसा म. फुले यांच्या कार्याचा सामाजिक दृष्टिकोण अधिक

सहजतेने व खोलवर रुजले असते. हे कार्य डॉ. ठाकूर यांच्या 'महात्मा' या कादंबरीने समर्थपणे केलेले आहे. ही या कादंबरीची फार महत्त्वाची अशी जमेची बाजू आहे''[४]

'महात्मा' ही म. फुल्यांवरील एक लक्षवेधी अशी कादंबरी असून म. फुले ह्यांचा जीवनपट तिच्यातून सुंदर पध्दतीने कादंबरीकाराने उलगडून दाखवला आहे. ही कादंबरी चरितकहाणी तर आहेच, पण त्याचबरोबर म. फुले ह्यांच्यासारख्या महामानवाचे विचारही ती सोप्या भाषेत व्यक्त करते. म. फुले ह्यांच्यासारख्या महामानवाचे माणूसपण कादंबरीकाराने ह्या कादंबरीत चित्रित केले आहे. अशी ही कादंबरी नव्या सहस्रकातील सामाजिक चळवळींना बळ देईल, ह्यात शंकाच नाही. 'महात्मा' कादंबरीतून एक कलात्मक आविष्कार झालेला आहे. म्हणूनच ह्या कादंबरीला 'रणजित देसाई पुरस्कार' इ.स. २००० मध्ये मिळाला. त्याचबरोबर 'रा. तु. पाटील परखड पुरस्कार' इ.स.२००२ मध्ये मिळाला. तसेच तिचे इतर भाषामध्ये अनुवाददेखील होत आहेत. हिंदी व इंग्रजी अनुवाद बाळ उर्ध्वरेषे करीत आहेत, कन्नड अनुवाद ल. रा. पंडित करीत आहेत, उर्दू अनुवाद सरताज बानो करीत आहेत. तामीळ अनुवाद आर. विवेकानंद गोपाळ करीत आहेत, तर गुजराथी अनुवाद प्रा. शशीन ओझा करीत आहेत.

## ७.५ समारोप :

अशा प्रकारे ह्या सहाव्या प्रकरणामध्ये 'महात्मा' चे महत्त्व जाणून घेत असताना प्रथम कादंबरीला आवश्यक असणाऱ्या चार प्रमुख घटकांचा कादंबरीकाराने कसा उपयोग केला आहे ते आपण लक्षात घेतल. कथानक, व्यक्तिरेखा, वातावरणनिर्मिती व भाषाशैली ह्या सर्व गोष्टींचा उपयोग अत्यंत उत्कृष्टपणे करून ही कादंबरी लिहिली आहे. ही कादंबरी कादंबरी म्हणून तर उत्कृष्ट आहेच, पण त्याचबरोबर ती चरित्रात्मक कादंबरी म्हणूनही उत्कृष्ट आहे. कारण चरित्रात्मक कादंबरीला आवश्यक असणाऱ्या सर्वच गोष्टींचा कादंबरीकाराने विचार केला आहे. चरित्रात्मक कादंबरीसाठी चरित्र, इतिहास व कादंबरीचे तंत्र ह्यांचा

विचार करावा लागतो. हे सर्व कादंबरीकाराने आपल्या कौशल्याने कादंबरीत मांडले आहे. 'महात्मा' चे हेच महत्त्व दिसून येते. कादंबरीनायकाने केलेल्या सामाजिक क्रांतिबरोबर वैचारिक क्रांतीही कादंबरीकाराला समाजाला पुन्हा एकदा लक्षात आणून द्यावयाची होती. हे त्याचे उद्दिष्ट सफल झाले आहे, असे शेवटी आपण नि:संदिग्धपणे म्हणू शकतो.

## संदर्भ


१. नरके हरी, ''नव्या सहस्रकातील सामाजिक चळवळींना 'महात्मा' ही कादंबरी बळ देईल'' (२ डिसेंबर १९९९ रोजी कोल्हापूर येथे 'महात्मा' ह्या कादंबरीच्य प्रकाशनप्रसंगी केलेल्या भाषणाचे लेखरूप संकलन), 'स्वच्छंद' दिवाळी अंक २०००, चंदगड (जि.कोल्हापूर), पृ. ११९

२. तत्रैव, पृ. १२५

३. कोत्तापले नागनाथ, ''शतकाच्या संधिकालात प्रसिध्द झालेली 'महात्मा' ही एक ऐतिहासिक घटना'', 'प्रतिष्ठान', औरंगाबाद, नोव्हेबर-डिसेंबर १९९९, पृ. ४०

४. इंगोले कृष्णा, '' मानवाचे माणूसपण चित्रित करणारी कादंबरी : 'महात्मा' '', 'इंद्रधनू' (रविवार पुरवणी), दै. संचार, सोलापूर, दि.२ एप्रिल २०००, पृ.